2017-18

461



# स्त्री आणि लिंगभेद : एक चिंतन

**प्रा.डॉ.चव्हाण सुरेश मारूती**
इतिहास विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, गडहिंग्लज

**प्रास्ताविक** - आज प्रगतीपथावर असणाऱ्या आधुनिक काळातही स्त्री आणि लिंगभेद यांचे अतूट नाते निर्माण झालेले दिसून येते. स्त्रीयांच्या संदर्भात विचार करता भारतीय राज्यघटनेच्या १४ व्या अनुच्छेदानुसार स्त्री-पुरूष समानता मान्य केलेली असून स्त्रियांना एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगण्याचा, आपला विकास करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.पण, लिंगभेदामुळे स्त्रीची दुय्यम अवस्था आहे तशीच असून मानवी हक्कांची पायमल्ली होताना दिसते.समाजातील लिंगभेदास स्त्रिच्या जन्मापासूनच सुरूवात होते.आज सर्वच क्षेत्रात स्त्री पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून काम करते आहे.तिने सामाजिक,राजकीय,आर्थिक क्षेत्रात अनन्यसाधारण स्थान निर्माण केले आहे.घर व नोकरी सांभाळून ती आपल्या जबाबदाऱ्या पार पाडत आहे. असे असले तरी समाजात असमानता असून लिंगभेद केला जातो हे मान्य करावे लागते. प्रत्येक स्त्री,मुलगी,पत्नी आई,सून,सासू अशा वेगवेगळ्या भूमिका पार पाडत असते. ती स्वतःचे अस्तित्व विसरून कुटुंबासाठी आपले आयुष्य खर्च करते. पण तिला जन्मतःच बाईपणाचे संस्कार करुन बाई बनवले जाते.तिच्याबद्दल अससमानतेची किंवा लिंगभेदाची कळत-नळकत वाक्येसुध्दा उद्गारली जातात.?उदा. बायकासारखं बोलू नकोस, काय, ते स्पष्ट बोल ? बायकांसारख काय भितोस ? बाईच वागणं थोड पुरुषी वाटतं ? पळून जायला मी काय बाई नाहीये. यावरुन समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दुय्यम दृष्टिकोन स्पष्ट होतो.स्त्री या शब्दात पावित्र, मांगल्य, प्रेम, जिव्हाळा, माया त्याग आणि वात्सल्य सामावलेले असते. स्त्री म्हणजे एक प्रेरणास्त्रोत असून जीवनाला आकार देणारी व जीवन सफल करणारी एक महान शक्ती असते पण तिलाच लिंगभेदाला बळी पडावं लागत आहे. वर्षानुवर्षे सीता-सावित्रीच्या कथा सांगून आजही स्त्रियांच्या समोर आदर्श प्रतिमा उभ्या केल्या जातात.पण आजची स्त्री जुन्या संस्कृतीने लादलेल्या आदर्श प्रतिमा नाकारून घुसमटणारी आपली भावना व्यक्त करताना सति-सावित्रीला उद्देशून म्हणते की,'निघून गेलीस स्वतः पावित्र्याचे धडे अन् प्रेमाच्या कसोट्या आमच्यावर लादून,तू झालीस नायिका पुराणकथेने फोफावलेल्या वटवृक्षाची,पण आमचे काय ? आम्ही पाचोळा झालो या जुनाट वटवृक्षांचा.या मतलबी सत्यवानाने केली आहे होळी आमच्या आयुष्याची, त्यांचे वाढू द्यायचे अनाटायी तण की संपवायच्या या जीवन मरणाच्या वेदना, ते एकदा सांगून जा', यातून आजच्या स्त्रीची होणारी घुसमट स्पष्ट दिसून येते, प्रस्तुत शोधनिबंधामध्ये समाजातील प्रतिनिधिक क्षेत्रामध्ये होणारा लिंगभेद सादर करण्याचा प्रयत्न केला आहे.

**सामाजिक क्षेत्रातील लिंगभेद :-**

स्वतःचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य स्त्रीला नसून पतीच्याच जीवनपद्धतीचा आधार घेऊन जीवन जगावे लागते. विद्यमान समाजव्यवस्थेमध्ये एखादा पुरूष पहिल्या निधनांनतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या स्त्रीशी विवाह करू शकतो. पण दुसऱ्या बाजूला पहिल्या पतीच्या मृत्यूनंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या पुरुषाशी विवाह करण्याचे स्वातंत्र्य स्त्रीला मात्र दिसत नाही. विधवा झालेल्या स्त्रीला अनेक बंधने असतात.पण पत्नी मेलेल्या पतीला कोणतीही बंधने नसतात.हुंडाबळी नावाच्या प्रथेला अनेक स्त्रिया बळी पडलेल्या दिसतात.पण पुरुष बळी पडलेले पहावयास मिळत नाही. समाजामध्ये अशी अनेक ठिकाणे असतात की,जिथे पुरुषांना मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य असते,पण स्त्रियांना मात्र नसते.बहुतांशी घरातील मुलांना घराबाहेर पडण्याचे व परत घरी येण्याचे बंधन नसते पण,मुलीवर मात्र ते बंधन असते.एक तर मुलगी जन्मास येऊ दिली जात नाही आणि जन्मास आलीच तर बंधनयुक्त साचेबद्धपणांच्या विचारांचा मारा तिच्यावर केला जातो. अनेक ठिकाणी तसेच धार्मिक ठिकाणी पुरुषांना प्रवेश दिला जातो.पण स्त्रियांना प्रवेश निषिद्ध मानला जातो.हा सुद्धा एक प्रकारचा लिंगभेदच आहे.समाजातील बहुतांशी घरातघरात मुलांच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण केल्या जातात.पण मुलींच्या इच्छा



I/C Principal
Art's Commerce & Science Mahavidyalaya
Gadhinglaj, Dist. Kolhapur
TRUE COPY

आकांक्षा पूर्ण केल्या जात नाहीत. समाजातील अन्याय,अत्याचार,हिंसाचार व बलात्कार यांचा विचार केल्यास तुलनेने पुरूषांपेक्षा स्त्रीलाच बळी पडावे लागते.

**जन्मासंबंधी लिंगभेद -**

जन्मापूर्वीच मुलींचा खून करणे ही रानटी व राक्षसी प्रवृत्ती भारतीय समजात रुजलेली असून ही बाब निश्चितच लिंगभेद करणारी व निंदनीय आहे. कारण २१ व्या शतकात शिकलेल्या व पुढारलेल्या कुटुंबातच स्त्री-भ्रुण हत्येंचे प्रमाण सर्वाधिक असलेले पहावयास मिळते.स्त्री-भ्रुणहत्या करू नका तर "मुलीच्या जन्माचे स्वागत करा" अस म्हणण्याची वेळच का यावी ? जिच्या ठिकाणी मातृशक्तीचा अविष्कार आहे. वात्सल्याचे अमृत आहे. निर्मितीची क्षमता आहे. देवी सामर्थ्याचे प्रतिबिंब आहे जिच्या-हृदुयात प्रेम आहे तिच आपल्याला आज नकोशी झालेली आहे.माया पाहिजे, प्रेम पाहिजे, वात्सल्य पाहिजे, स्नेह पाहिजे, सेवा पाहिजे, पण हे सगळे देणारी आई नको, बहीण नको, वहिनी नको, आज्जी नको म्हणून गर्भातच तिचा अंश घालवण्याचा विचार करुन डॉक्टरांकडे जायचं, सोनोग्राफी करुन घ्यायची आणि कायद्याने बंधन असतानासुद्धा गर्भपात करायचा हे दृष्टचक्र लिंगभेदाचा उच्चांक गाठणारे असून मानवी हक्कांची पायमल्ली करणारे आहे. आज विज्ञानाची प्रगती मानवास शाप की वरदान हा प्रश्न पडतो कारण जिथे-जिथे सोनोग्राफी सेंटर्स अधिक आहेत जिथे तिथे स्त्रीभ्रुणहत्येचं प्रमाण अधिक आहे. संपूर्ण देशाचा विचार केला तर ग्रामीण-शहरी, गरीब-श्रीमंत, विकसित-अविकसित अशा सर्व भेदांना ओलांडून सर्वच ठिकाणी मुलींना आईच्या गर्भातच जाणीवपूर्वक गायब केले जाते.ज्या पुणे शहरात स्त्री शिक्षणाचा प्रसार फुले दांपत्यांनी केला,महर्षी कर्वेनी स्वतंत्र महिला विद्यापीठाची स्थापना करून इतिहास घडविला,त्याच पुरोगामी महाराष्ट्रातील पुणे शहरात उमलू पाहणाऱ्या कळ्यांना गर्भातच तोडून टाकण्याचा घृणास्पद प्रकार मोठ्या प्रमाणात दिसून येतो. देशाच्या सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या राष्ट्रपती पदावर प्रतिभाताई पाटील आरुढ होत असतानाच ओरिसा राज्यातील नायगढ शहरातील एका नर्सिंग होमच्या पाठीमागे असणाऱ्या या विहिरीत नवजात अर्भकांचे मृतदेह सापडले. त्यात बहुतांशी मृतदेह महिलांचे होते.म्हणजेच एकीकडे देवतेसमान आणि दुसरीकडे तिला माणूस म्हणून जगता येणार नाही याचा दांभिकपणा दाखवायचा किंवा एका बाजूला तिला कमी/दुय्यम प्रतीचे मानून तिचे अस्तित्व झुगारून द्यायचे आणि दुसऱ्या बाजूला तिच्या लैंगिक संबंधांचा हव्यास बाळगायचा अशा विचित्र मानसिकतेत आजचा समाज अडकलेला दिसतो.

**शैक्षणिक क्षेत्रातील लिंगभेद -**

आज शिक्षणासारख्या महत्त्वाच्या व पवित्र क्षेत्रामध्येही मोठ्या प्रमाणात लिंगभेद पहावयास मिळतो. शिक्षणापासून कुणीही वंचित राहणार नाही अशी घोषणा करणाऱ्या या देशात ५९ टक्के मुस्लिम महिला कधीच शाळेत गेलेल्या नाहीत. तर फक्त १० टक्के मुस्लिम महिलानीच शालेय शिक्षण घेतलेले आहे. कोणत्याही देशाच्या समाजाची गतिमानता ही लोकांच्या शैक्षणिक पातळीवर अवलंबून असते. पण भारतात लिंगभेदामुळे ती समानता दिसत नाही.कारण पुरूष साक्षरतेचे प्रमाण ८२-१८ टक्के तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ६५-४६ टक्के आहे.रूढी आणि परंपरेच्या नावाखाली स्त्रीवर होणाऱ्या या अन्यायाला आळा घालण्यासाठी स्त्रीला शिक्षण देऊन स्वावलंबी केले पाहिजे.पण आज भेदभाव करून मुलींना १२ वी ते पदवीपर्यंचेच शिक्षण दिले जाते. माझ्या महाविद्यालयात सर्वात जास्त मुलींचे विवाह हे बी. ए. भाग एक मध्ये असतानाच होतात. कारण आईवडीलच स्वतःच्या पायावर उभे करून स्वावलंबी करण्यास उत्सुक नसतात.म्हणून एखादे चांगले स्थळ आले की, कोणताही विचार न करता पालक तिचे लग्न उरकून टाकतात. पण दुसऱ्या बाजूला मात्र मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था जिद्दीने व जोमाने करतात. शिक्षणासंबंधी मुलांच्या सर्व अपेक्षा पूर्ण केल्या जातात.पण मुलीच्या अपेक्षांना डावलेले जाते.मुलगा हा वंशाचा दिवा असून मुलगी ही दुसऱ्याचे धन आहे. हा नकारात्मक व उदासिन दृष्टिकोन पालकांचा असलेला दिसतो. त्यामुळेच ज्या स्त्रिया शिक्षणापासून वंचित आहेत. त्यांची संख्या साक्षर स्त्रियांच्या तुलनेत जास्त आहे. स्त्रिया शिक्षण घेत आहेत असं जरी वरून वाटत असले तरी वास्तवात स्त्री साक्षरतेचं प्रमाण खूपच कमी आहे.उदा. सेन्सस ऑफ इंडिया २००१ नुसार ७ ते १५ वयोगटातील स्त्री निरक्षरतेचं प्रमाण पुढीलप्रमाणे आहे.

**स्त्री निरक्षरतेचे प्रमाण दर्शविणारा तक्ता**

| वयोगट | एकूण स्त्रिया | निरक्षर स्त्रिया | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 7 | 9.24.632 | 2,27,414 | 24,59 |
| 8 | 10.45.813 | 128996 | 12.33 |
| 9 | 9,81,373 | 96,407 | 07.7 |
| 10 | 12,67,068 | 96,867 | 7.64 |
| 11 | 9,82,138 | 43,222 | 4.40 |
| 12 | 12,08,92 | 86,850 | 7.18 |
| 13 | 9,59,012 | 54,884 | 5.72 |
| 14 | 9,74,345 | 68,937 | 7.07 |
| 15 | 9,05,377 | 81,462 | 9 |

वरील तक्त्यावरून ढोबळमानाने स्त्री निरक्षरता स्पष्ट होत असली तरी ग्रामीण भागातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी व असमान स्वरूपाचे दिसून येते.

**राजकीय क्षेत्रातील लिंगभेद**

राजकारण क्षेत्र हे स्त्री-पुरूष असमानता दाखवणारे, लिंगभेद करणारे व मानवी हक्कांची पायमल्ली करणारे सर्वात मोठे क्षेत्र आहे. कारण राजकारणातील स्त्रियांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत खूपच कमी असून सामाजिक विषमता दर्शविणारे आहे. २०११ मध्ये महाराष्ट्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देणारे विधेयक मंजूर केल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील स्त्रियांचा सहभाग निश्चितच वाढला आहे. अहमदनगर जिल्ह्यातील आदिवासी सरपंच सौ. सुशिलाबाई मकासूरे यांनी युनस्कोचे महाराष्ट्रातील पहिली संगणीकृत ग्रामपंचायत म्हणून पारितोषिक मिळवून दिले.

गडचिरोली जिल्ह्यातील सौ. उर्मिला गोमसाळ व भाग्यश्री पाटील यांनी उत्कृष्ट कामाचा आदर्श घालून फक्त पुरूषच कांही करू शकतात हा सिद्धांत खोडून काढला. पण खरा प्रश्न आहे तो देशपातळीवरचा. कारण लोकसभा व राज्यसभेतील स्त्री सदस्यांशांची संख्या पाहिल्यास या देशात किती मोठा लिंगभेद केला जातो हे स्पष्ट होण्यास मदत होते. या संदर्भात १९५२ पासून ते २००९ पर्यंत लोकसभा व राज्यसभेतील स्त्रीसदस्य प्रमाण दर्शविणरा तक्ता बराच बोलका आहे.

**संसदेतील स्त्रीसदस्य दर्शविणारा तक्ता**

| वर्ष | 1952 | 1957 | 1962 | 1967 | 1971 | 1977 | 1980 | 1984 | 1989 | 1991 | 1996 | 1998 | 2004 | 2009 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लोकसभा | 22 | 27 | 34 | 31 | 22 | 19+ | 28 | 44 | 27 | 39 | 40 | 43 | 45 | 59 |
| राज्यसभा | 16 | 18 | 18 | 22 | 17 | 25 | 24 | 28 | 24 | 38 | 22 | 22 | 22 | 19 |

देशाच्या राजकारणात प्रतिभाताई पाटील, सोनिया गांधी,मिरा कुमार,सुषमा स्वराज,शिला दिक्षीत,वसुंधराराजे, जयललिता, मायावती, ममता बॅनर्जी, या सारख्या शेकडो स्त्रियांनी आपली गुणवत्ता सिद्ध केलेली आहे.तरी आज देशपातळीवर स्त्रियांना ५० टक्के जागा म्हणजेच समान जागा दिलेल्या दिसत नाहीत.म्हणजेच लिंगभेद झालेला दिसतो. कारण पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांचा राजकारणात सहभाग खूपच नगण्य आहे. शिवाय हजारो गावच्या सरपंच महिला असल्या तरी वास्तव कारभार तिचा पतीच पाहताना दिसतो. ही मानवी हक्कांची पायमल्लीच आहे.एक तर महिलांना राजकारणात पुढे येऊ दिले जात नाही. पुढे आणले तर निवडून दिले जात नाही. निवडून आणले तर प्रत्यक्ष कारभार करू दिला जात नाही. आणि प्रत्यक्ष कारभार केलाच तर पतीचा हस्तक्षेप मान्य करावा लागतो.आज स्त्रिया पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून राज्यकारभारात उत्तुंग भरारी घेत आहेत. हे पुरूषी अहंकारात बसणारे नाही.सर्वच पुरूष स्त्रीच्या राजकारणातील सहभागाचे तोंड भरून कौतुक करत असले तरी अंतर्मनातून त्यांचा पाठिंबा आहे असे खात्रीने सांगता येत नाही.

464



**करिअर क्षेत्रातील लिंगभेद** -

काही क्षेत्रांचा अपवाद वगळता बहुतांशी नोकरी किंवा करिअरच्या क्षेत्रातील लिंगभेद मनाला थक्क करणारा आहे. आजच्या घडीला अनेक क्षेत्रातील उच्च पदावर काम करणाऱ्या स्त्रीची पात्रता असूनही तिची सेवा ज्येष्ठता नाकारली जाते. स्त्रीची गुणवत्ता असूनही योग्य ती दखल घेतली जात नाही.पदोन्नती दिली जात नाही.उलट स्त्रीचे विविध पद्धतीने शोषण केले जाते.उदाहरणच द्यायचे झाले तर मिलटरीमध्ये सेवा ज्येष्ठतेनुसार उच्चपदावर असूनसुद्धा त्यांना मानाची वागणूक मिळत नाही.तर हलक्या दर्जाची कामे करावी लागतात. कामाच्या ठिकाणी स्त्रीच्या लैंगिग शोशणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहेत. आज रोजी माझ्या महाविद्यालयात स्त्री -पुरूष प्राध्यापकांचे प्रमाण १०:२ असे आहे. सर्व साधारणपणे अशीच अवस्था सर्वच महाविद्यालयांची दिसून येते हे एक प्रकारे लिंगभेदाचेच प्रतिक आहे. शिक्षण क्षेत्र, पोलीस, आर्मी, विविध कंपन्या,विविध महामंडळे,उद्योगधंदे,सोसायट्या,पतसंस्था,विविध कार्यालये,कारखाने,सुतगिरण्या,प्रशासकीय सेवा आणि बँकीग क्षेत्र या सारख्या अनेक करिअरच्या क्षेत्राचा अभ्यास केल्यास पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण अतिशय अल्प असल्याचे पाहावयास मिळते.केवळ स्त्री आहे म्हणून तिला डावलले जाते.निवड झाली तर तिची पदोन्नती केली जात नाही. पदोन्नपती झाली तर सहकार्य केले जात नाही. आणि त्याही अवस्थेत स्त्री कार्यक्षम राहिल्यास वेगवेगळ्या मार्गांनी तिचे शोषण करण्याचा प्रयत्न केला जातो.

**आर्थिक क्षेत्रातील लिंगभेद** -

आर्थिक क्षेत्रातील लिंगभेदाचा इतिहास फारच जुना आहे.कारण पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये आर्थिक व्यवहारात स्त्रीला नेहमीच दुय्यम स्थान दिले गेले आहे. खरेतर अर्थ व समाजव्यवस्थेत स्त्रीला दुय्यम स्थान असल्यामुळेच ती आजपर्यंत संधीवंचित,अर्थवंचित,सत्तावंचित आणि प्रतिष्ठावंचित राहिलेली आहे.महिला समस्यांचे मूळ आर्थिक असल्याने व ते त्यांच्या हातात नसल्याने स्त्रीला आर्थिक सुबत्ता येऊ शकली नाही.म्हणजेच श्रमाच्या बाजारपेठेत महिलांची कामे निकृष्ठ दर्जाची असून त्यांना व्यवहाराचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नसते.एकतर तिला घरगुती कामातून सवड मिळत नाही,आपल्या क्षमतांचा विकास करण्याची किंवा आवडीचे क्षेत्र निवडून काम करण्याची संधी मिळत नाही आणि संधी मिळालीच तर मिळेल ती नोकरी करून मिळणारा आर्थिक मोबदला मात्र पतीच्या स्वाधीन करावा लागतो.कारण पुरूषप्रधान समाजव्यस्थेमध्ये स्वातंत्र्याचे, प्रगतीचे व खर्चाचे सर्व मार्ग पुरूषांच्या ताब्यात असतात.एका सर्वेक्षणानुसार सुमारे १६ टक्के नोकरी करणाऱ्या स्त्रियांना घराबाहेर पडताना पतीकडून पैसे घ्यावे लागतात.अर्थात पुरूषांची मानसिकताच अशी असते की, स्त्रीने घरी राहून कुटुंबाचा सांभाळ करावा आणि अगदीच गरज भासली तरच तिने घराबाहेर पडून काम करावे. त्यामुळेच भारतीय महिला पुरूषांबरोबर कमी प्रतिष्ठेची कमी वेतनावर सर्व कामे करतात,पण त्यांच्या कामांची नोंद व मोबदला याची कुठेच नोंद आढळत नाही.कामाच्या वेतनावर तिचा हक्क नसून ते पतीच्या हातात द्यावे लागते.परिणामी अशा स्वरूपाच्या लिंगभेदामुळेच आज भारतीय स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी नसलेल्या दिसतात.

**उपाययोजना** :स्त्रियांच्या हक्कांची जपणूक होण्यासाठी लिंगभेद होणार नाही यासाठी पुढील उपाय महत्त्वाचे ठरू शकतील.

१) अनिष्ठ रूढी व परंपरांचा नाश करणे.
२) समाजातील मानवतेची मानसिकता तयार करणे.
३) स्त्री-पुरूष समानता या तत्त्वाचा स्वीकार करणे.
४) भ्रूण हत्या प्रतिबंधक कायद्याचे काटेकोरपणे पालन करणे.
५) कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना कडक शिक्षा देणे
६) लिंगभेदाविरूद्ध जनजागृती करणे.
७)कुठल्याच पातळीवर लिंगभेद होणार नाही याची दक्षता घेणे.
८)शासकीय, निमशासकीय पातळीवर जनजागृती व प्रयत्न करणे.
९)सभा, कार्यक्रम, चर्चासत्रे आणि विविध स्पर्धांचे आयोजन करणे.
१०)याक्षेत्रात चांगले काम करणाऱ्यांचा सन्मान करून इतरांना प्रेरीत करणे.

समारोप

लिंगभेदामुळे होणारी स्त्री हक्कांची पायमल्ली हा २१ व्या शतकातील समाजासमोरचा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. लिंगभेद होणार नाही याची दक्षता घेत मानवी हक्कांची जपणूक करणे ही बाब कुटुंब, समाज व देशासाठी निश्चितच गरजेचे आहे. भारतीय पुरूष मातेच्या चरणावर भक्तिभावाने लोटांगण घालतो.पण मातेचे चरण सोडून बाहेर आला की, बायकोला चोपण्यास प्रवृत्त होतो. म्हणजेच स्त्री ही समानतेच्या तत्त्वाने वागण्याऐवजी तो तिला आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करतो. ही प्रवृत्ती घातक असून ती बदलावयासच हवी.समाजाने बाई या संकल्पनेचा त्याग करून माणूसपणाची संकल्पना स्वीकारायला हवी.मुलाप्रमाणेच मुलींनासुद्धा स्वातंत्र्य देणारे आईवडील आपण व्हायला हवे.महिलांना सर्वांगीणदृष्ट्या समान संधी देऊन स्वावलंबी बनवून पुरूषांएवढेच महत्त्वाचे स्थान कुटुंब व्यवस्थेत द्यायला हवे.

स्त्री केवळ शरीर नाही तर ती सुद्धा एक माणूस असून समाजाचा एक अविभाज्य घटक आहे हे मान्य करायला हवे.लिंगभेदाचा विचार हद्दपार करण्याचा प्रयत्न केला तरच समानतेचा जन्म होईल आणि त्या समानतेमधूनच मानवी हक्कांची जपणूक होईल.शेवटी जोपर्यंत समाजची मानसिकता बदलत नाही,तिला समानसंधी देण्यासाठी पुरूष एक पाऊल मागे येणार नाही, आणि आलेल्या संधीचा स्वीकार करून स्त्री एक पाऊल सामर्थ्याने पुढे टाकणार नाही. तोपर्यंत खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता आणि त्यावर आधरित नव समाज निर्माण होणार नाही.

संदर्भ -

१) मृणालिनी जोगळेकर, स्त्री मुक्तीच्या उद्गाता, पुणे १९९८
२) श.वा.दांडेकर, भारतातील थोर स्त्रिया, पुणे १९६३
३) महात्मा फुले आणि स्त्रीमुक्ती आंदोलने - मुंबई १९८१
४) प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकंरजी - मे २००९
५) प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकंरजी - जून २००९
६) प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकंरजी - मार्च २०१०
७) प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकंरजी - दिपावली अंक २०१०
८) सेन्सस ऑफ इंडिया २००१
९) विकास समर्पित मसिक, 'योजना' जून २०१०
१०) विकास समर्पित मसिक 'योजना' जुलै २०१०
११) महाराष्ट्र आरोग्य पत्रिका, नोव्हेंबर २०११
१२) विविध क्षेत्रातील निवडक महिलांच्या मुलाखती २०११

I/C Principal
Art's, Commerce & Science Mahavidyalaya
Gadhinglaj, Dist. Kolhapur

TRUE COPY